**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**रविवार दिनांक ०१ फेब्रुवारी २०२६**

**ठळक बातम्या**

1. **युवा शक्तीला केंद्रस्थानी ठेवून तयार केलेला ३ कर्तव्यांवर भर देणारा अर्थसंकल्प निर्मला सीतारामन यांच्याकडून लोकसभेत सादर.**
2. **देशातील शहरांमधील विकासाला जोडणारे मुंबई-पुणे, पुणे-हैदराबाद हायस्पीड रेल्वेची घोषणा.**
3. **विकसित भारताच्या गरुडझेपेचा हा अर्थसंकल्प असल्याची पंतप्रधानांची प्रतिक्रिया, मुंबई-पुणे, पुणे-हैदराबाद हायस्पीड कॉरिडॉरमुळे राज्यात जीडीपीत मोठी वाढ होण्याची मुख्यमंत्र्यांची प्रतिक्रिया.**
4. **सर्व समाजघटकांना निराश करणारा दिशाहीन अर्थसंकल्प असल्याची विरोधकांची अर्थसंकल्पावर टीका.**

तीन कर्तव्यांवर आधारित अर्थसंकल्प

देशातल्या युवा शक्तीला केंद्रस्थानी ठेवून तयार केलेला अर्थसंकल्प केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी आज लोकसभेत सादर केला. त्यात आर्थिकवृद्धीदर वाढवणे, नागरिकांचं कौशल्य विकसित करणे आणि सर्व नागरिकांना सोयीसुविधा, सवलतींचा पुरेपूर लाभ देणे, या ३ कर्तव्यांवर आधारित हा अर्थसंकल्प असल्याचं त्या म्हणाल्या. २०२६- २७ या आर्थिक वर्षासाठी साडेत्रेपन्न लाख कोटींचा हा अर्थसंकल्प आहे. या वर्षात सरकारला साडे छत्तीस लाख कोटी रुपये एकूण महसूल मिळेल, त्यातले २८ लाख ७० हजार कोटी रुपये करवसुलीतून मिळतील. येत्या आर्थिक वर्षात वित्तीय तूट ४ पूर्णांक ३ दशांश टक्के राहील असा अंदाज आहे. चालू आर्थिक वर्षात ती चालू वर्षीच्या ४ पूर्णांक ४ दशांश टक्के राहण्याची शक्यता आहे. चालू आर्थिक वर्षासाठीचा करसंकलनाचा सुधारित अंदाज ३४ लाख कोटी तर व्ययाचा सुधारित अंदाज ४९ लाख ६० हजार कोटी रुपये असा व्यक्त केला आहे. १६व्या वित्त आयोगाचा अहवालही त्यांनी आज लोकसभेत सादर केला.

रेल्वे कॉरीडॉर

यंदाच्या अर्थसंकल्पात सिटी इकॉनॉमिक रिजन अर्थात शहरी आर्थिक क्षेत्रांचा विकास करण्याची घोषणा अर्थमंत्र्यांनी आज केली. त्यासाठी प्रत्येक क्षेत्राला ५ वर्षात ५ हजार कोटी रुपयांचा निधी दिला जाणार आहे. याशिवाय दुसऱ्या आणि तिसऱ्या श्रेणीतली शहरं, तसंच तीर्थस्थळांवर लक्ष केंद्रीत करण्याचा निर्णय केंद्र सरकारनं घेतला आहे. देशभरात दळणवळण सुविधा मजबूत करण्याच्या उद्देशानं विविध महानगरं जोडणाऱ्या रेल्वेच्या ७ हायस्पीड कॉरिडॉर्सची घोषणा आज केंद्रीय अर्थमंत्र्यांनी अर्थसंकल्पीय भाषणात केली.

***In order to promote environmentally sustainable passenger systems, we will develop 7 high speed rail corridors between cities as growth connectors, namely Mumbai to Pune, Pune to Hyderabad, Hyderabad to Bengaluru, Hyderabad to Chennai, Chennai to Bengaluru, Delhi to Varanasi, Varanasi to Siliguri.***

देशातल्या महत्त्वाच्या औद्योगिक कॉरिडॉर्सच्या जवळ ५ शैक्षणिक परिसर विकसित करायची घोषणा अर्थमंत्र्यांनी केली. विविध विद्यापीठं, महाविद्यालयं, संशोधन संस्था, कौशल्य केंद्रांची संकुलं इथं सुरू होतील. विज्ञान, तंत्रज्ञान, इलेक्ट्रॉनिक्स आणि गणित या क्षेत्रांमध्ये विद्यार्थिनींचा सहभाग वाढवण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात त्यांच्यासाठी वसतीगृह सुरू केलं जाणार आहे. मुंबईतल्या इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ क्रिएटिव्ह टेक्नॉलॉजीजच्या माध्यमातून १५ हजार माध्यमिक शाळा आणि ५०० महाविद्यालयांमध्ये AVGC अर्थात अनिमेशन व्हिजुअल ग्राफिक्स आणि कॉमिक्स कंटेंट क्रिएटर लॅब्स सुरू केल्या जाणार आहेत. ज्येष्ठ नागरिकांना आरोग्य सुविधा पुरवणाऱ्यांना योग, तसंच वैद्यकीय उपकरणं वापरण्याचं प्रशिक्षण देऊन, येत्या काळात अशा दीड लाख काळजी वाहकांना प्रशिक्षित करायचं ध्येय अर्थमंत्र्यांनी आज जाहीर केलं. आयुर्वेदाला चालना देण्यासाठी ३ नव्या अखिल भारतीय आयुर्वेद संस्थांची स्थापना केली जाणार आहे. पशुवैद्यकीय क्षेत्रातही अतिरिक्त महाविद्यालयं सुरू केली जाणार आहेत. दिव्यांग नागरिकांना माहिती तंत्रज्ञान, आदरा तिथ्य, खाद्यपेय क्षेत्रात संधी उपलब्ध करुन देण्यासाठी सरकारमार्फत विशेष प्रशिक्षण दिलं जाणार आहे. दिव्यांग सहारा योजना सुरू करुन या नागरिकांना कृत्रिम अवयव पुरवणं, त्यांच्यासाठी विशेष मॉल सुरू करणं यासह विविध योजना सरकार राबवणार आहे. निवडक २० पर्यटनस्थळांवर १० हजार गाईड्स करता प्रशिक्षण अभ्यासक्रम सुरू करण्याचा प्रस्ताव त्यांनी अर्थसंकल्पात मांडला आहे.

प्रतिक्रिया अर्थसंकल्प

यंदाचा अर्थसंकल्प हा २०४७च्या विकसित भारताच्या गरुडझेपेचा हा एक सशक्त आधार असल्याचं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं. सुधारणांच्या प्रक्रियेला उर्जा आणि गती देण्याचं काम हा अर्थसंकल्प करणार आहे, असं ते म्हणाले.

***आज भारत जिंस रिफॉर्म एक्सप्रेस पर सवार है। इस बजट से उसे नई ऊर्जा, नई गति मिलेगी़ जो पाथब्रेकिंग रिफॉर्म्स किए गए वो एक्सप्रेशन से भरे हुए भारत के साथ सीख टैलेंटेड युवाओं को उड़ने के लिए खुला आसमान देते।***

दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केंद्रीय अर्थसंकल्पावर वर्षा निवासस्थान येथे माध्यमांशी संवाद साधतांना विकसित भारताकडे दमदार पाऊल टाकणारा हा अर्थसंकल्प आहे. मुंबई-पुणे, पुणे-हैदराबाद हायस्पीड कॉरिडॉरमुळे राज्यात जीडीपीत मोठी वाढ होईल, अशी प्रतिक्रिया व्यक्त केली.

***अनेक वर्षांची मागणी होती मुंबई - पुणे हायस्पीड कॉरिडोर त्याची घोषणा झाली आहे. पुणे- हैदराबाद हाय स्पीड कॉरिडोरमुळे संपूर्ण पश्चिम महाराष्ट्राचे क्षेत्र आहे. त्याला त्याचा एक मोठा फायदा आणि मराठवाड्याच्या क्षेत्राला देखील तसा फायदा होईल. अशा प्रकारचा हाय स्पीड कॉरिडोर होतो आहे. यामध्ये सर्वाधिक वेगाने विकसित होणारी अर्थव्यवस्था पुन्हा एकदा भारत प्रस्थापित झालेला आहे. ७% च्या ग्रोथ रेटमुळे आणि हे सगळं करत असताना ती अतूटही साडेचार टक्क्याच्या आत आणण्या पुन्हा एकदा अर्थमंत्र्यांना यश मिळालेला आहे.***

तसेच, येत्या ५ वर्षांत प्रत्येक ग्रोथ हबसाठी ५ हजार कोटी रुपये दिले जाणार असल्यानं मुंबई महानगर, पुणे महानगर आणि नागपूर महानगराला मोठा फायदा होईल, असा विश्वासही मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला. भारताला जागतिक बायो फार्मा उत्पादन केंद्र म्हणून विकसित करण्यासाठी पुढील पाच वर्षांसाठी 10,000 कोटी रुपयांच्या तरतुदीसह 'बायो फार्मा शक्ती' ही योजना, मुंबई ते पुणे, पुणे ते हैदराबाद, असे सात हाय-स्पीड रेल्वे कॉरिडोर यातून विकसित भारताची निर्धारशक्ती दिसल्याची अशी प्रतिक्रिया भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी व्यक्त केली. मुंबईतील भाजपा प्रदेश कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

विरोधी पक्ष प्रतिक्रिया

देशातल्या खऱ्या समस्यांवर या अर्थसंकल्पानं कानाडोळा केल्याची प्रतिक्रिया लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी दिली आहे. तर या अर्थसंकल्पात आर्थिक, सामाजिक आणि राजकीय आव्हानांवर कुठलाही पर्याय सुचवलेला नसल्याचं राज्यसभेतले विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खर्गे म्हणाले. SC, ST, OBC, आर्थिक मागास आणि अल्पसंख्यकांचा यात उल्लेखही नसल्याचं ते म्हणाले. तर हा अर्थसंकल्प कोणत्याही समाजघटकाचे समाधान करणारा नसून केवळ मोठे आकडे आणि दावे मांडण्यापुरताच मर्यादित आहे. अशी टीका महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली.

***बेरोजगारांना मध्यमवर्गीयांना शहरी भागातील नागरिकांना आणि शेतकऱ्यांना काहीही दिलेला नाही. सर्वांच्या हातावर तुरी टेकवण्याचं काम केंद्रीय अर्थसंकल्पाच्या माध्यमातून झालेला आहे ना रोजगाराची गॅरंटी आहे. ना शेतमाल हमीभावा आहे, ना शहरीकरणाच्या वाढत्या समस्यांच्या अनुषंगाने दिलासा आहे.***

सरकार १० वर्षांत २५ कोटी लोक गरिबीतून बाहेर येतील असा दावा करत आहे; मात्र प्रत्यक्षात ८० कोटी जनतेला पाच किलो धान्य द्यावे लागत आहे. मग २५ कोटी लोकांची गरिबी कशी संपली, हा मोठा प्रश्न आहे. महागाई आटोक्यात आणण्यासाठीही कोणतेही ठोस धोरण दिसत नसल्याचेही सपकाळ यांनी स्पष्ट केल. तर हे बजेट केवळ काही मोजक्या उद्योगपतींच्या फायद्याचे असून, देशाच्या अन्नदात्याला मात्र पुन्हा एकदा वाऱ्यावर सोडले आहे, अशी टिका काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी केली.

आयकर नियम / स्टॉक मार्केट

येत्या नवीन आर्थिक वर्षापासून देशात नवीन प्राप्तिकर कायदा लागू होणार आहे. त्यात प्राप्तिकराचे नियम आणि परताव्याचे अर्ज सुलभ केले असून लवकरच ते उपलब्ध होतील. सर्वसामान्य नागरिकांना सुलभरित्या भरता येतील अशा रितीने हे अर्ज तयार केल्याची माहिती निर्मला सीतारामन यांनी दिली. आयटीआर १ आणि आयटीआर २ हे अर्ज भरणाऱ्यांना ३१ जुलै पर्यंतच हे अर्ज भरावे लागतील. इतरांना मात्र ३१ ऑगस्टपर्यंत मुदत वाढवून मिळणार आहे. सुधारित आयकर विवरण पत्र आता नाममात्र शुल्क भरुन ३१ डिसेंबर ऐवजी ३१ मार्चपर्यंत भरता येईल. शेअर बाजारात गुंतवणूक असणाऱ्यांना आता डिपॉझिटरीकडे एकदाच १५ जी किंवा १५ एच अर्ज भरता येणार. हाच अर्ज गुंतवणूक केलेल्या सर्व कंपन्यांना पुरवला जाईल. याशिवाय TCS, TDS यातही काही सुधारणांची घोषणा आजच्या अर्थसंकल्पात झाली. तसंच कर चोरीच्या काही प्रकरणांमध्ये दंड भरुन नागरिकांना मुक्त होता येणार आहे. सहकारी संस्था, माहिती तंत्रज्ञान कंपन्या, डेटा सेंटर स्थापन करणाऱ्या कंपन्यांना आयकरात सवलत जाहीर झाली आहे.

*****